
गरीब फेरीवाला

प्राचीन अरब कहाणी



फ्लाविया वेडन

मराठी: अश्विनी बर्वे

चित्र: फ्लाविया वेडन

एक सुंदर छोटे शहर होते जे एक हिरव्यागार पहाडाच्या तळाशी वसले होते. पण तिथे राहणारे लोक दुःखी होते,कारण ते आपल्या तक्रारी आणि दुःखांच्या पलीकडे बघू शकत नव्हते. एक दिवस एक फेरीवाला शहरात आला आणि त्याने नगरवासीच्या समस्या घेऊन त्यांना आनंद देण्याचे ठरवले. लोकांनी त्यांचे विचारांची चेष्टा केली. ते कसं शक्य होतं? शेवटी लोकांनी ठरवले कारण त्यांच्याजवळ गमावण्यासारखे काहीच नव्हते. पण शेवटी जे काही झाले ते वास्तवात अद्भुत आणि जादुई होते.

ही लोककथा आपल्याला सगळ्यांना याची आठवण करून देते की आनंद एक असा पर्याय आहे, ज्याची आपण सगळे निवड करू शकतो आणि आपल्याला असा प्रयत्न करायला की आपल्या आयुष्यावर समस्या वरचढ होणार नाहीत, आणि त्या आपल्या जीवनातला आनंद हिरावून घेणार नाही.


चंद्राच्या दुसऱ्या बाजूला आपल्या घरात, काळ देवाने, आपल्या आठ विश्वासू कथाकारांना सुद्धा, सगळ्या मुलांना आशेचा संदेश देण्यासाठी बोलावले. त्यांचे कार्य जगभर जादूई कहाण्याचा प्रसार करण्याचे होते. या कहाण्या आपल्याला आठवण देतात की आपण सगळे एका परिवारातले एका जगातले आहोत. आपले हृदय एकच भाषा बोलतात, मग आपण कुठेही राहत असू. आपण कितीही वेगळे दिसत असू, वेगळी बोली बोलत असू. आणि आपल्या प्रत्येकाला हा अधिकार आहे की या जगाने आपल्यावर प्रेम करावे, आपलं पालन-पोषण करावे. आणि आपल्या स्वप्नांपर्यंत पोहचायला मदत करावी.

ही कहाणी त्यातली एक आहे.आपल्या हृदयाचा आवाज ऐका आणि त्याची जादू दुसऱ्याबरोबर वाटा.

गरीब फेरीवाला

प्राचीन अरब कहाणी





काही काळा पूर्वी, एका पहाडाच्या तळाशी,,एक छोटे गाव होते. तिथले लोक नेहमीच तक्रारी करत असत आणि त्याविषयी सतत बोलत असत.

त्यांच्याजवळ जे काही होते त्याने ते समाधानी नव्हते आणि नेहमी वाद घालत असत आणि दुःखी होत. गावात राहणाऱ्या सगळ्या लोकांकडे काम होते, म्हणून सगळ्यांकडे एक घर, पुरेसे जेवण आणि घालण्यासाठी कपडे होते. पण त्यांच्यातले प्रत्येकजण विचार करे की त्यांची समस्या भयंकर आहे, आणि गावातल्या इतर लोकांशी तुलना केली तर त्यांचा त्रास सगळ्यात जास्त आहे.




ते लोक सतत तक्रार करत असत खरंतर त्यांनी आनंदी राहायला हवे होते आणि इतके चांगले जीवन मिळाल्याबद्दल आभार मानायला हवे होते.





त्यांनी हे ही कधी पाहिलं नाही की वसंत आणि उन्हाळ्यात, पहाडाच्या तळाशी त्यांची शेतं किती सुंदर दिसतात आणि ते हिरवेगार होती आणि त्यांच्या बागेत चारी बाजूला चमकदार फुलं उगवली होती.




आणि जेव्हा हिवाळ्यात बर्फाने पहाड झाकून जायचा, तेव्हा उन्हात तो कितीतरी सुंदर दिसत असे. मावळणारा सूर्याचा हलका गुलाबी रंग कितीतरी सुंदर दिसत असे. लोक हा विचार करत नसत की ते किती भाग्यवान आहेत की त्यांना इतक्या सुंदर गावात राहण्याचे भाग्य लाभले.




मग एक दिवस एक अनोळखी गावात आला. तो एक फेरीवाला होता त्याने एक फाटका कोट आणि एक जुनी फाटलेली टोपी घातली होती.त्याच्याजवळ एक फाटलेली छत्री होती आणि त्याच्या खांद्यावर एक मोठी टोपली लटकलेली होती.

पट्टासारखी त्याच्या पोटावर एक लांब दोरी बांधलेली होती. त्याचे बूट जुने होते आणि त्याच्यावर शिवलेले होते.





तो माणूस शहराच्या चौकात आला. तो तिथं थांबला आणि त्याने तिथं लोकांना सांगितले, “तुमचा पहाड सोन्याच्या सारखा चमकत आहे. आणि इथली छते आणि मिनार सुंदर आकाशाचे गुलाबी रंग दाखवतात. तरीही तुम्ही लोक दुःखी का? या, तुम्ही सगळे माझ्याजवळ येऊन बसा. मी तुम्हांला आनंद विकायला आलो आहे.”





त्याचे बोलणे ऐकून सगळे लोक हसले आणि त्यांनी त्याला मूर्ख ठरवले. “तू केवळ एक मुर्खासारखा दिसत नाही तर एका मुर्खा सारखे बोलतो सुद्धा,” लोक म्हणाले, तू तुझ्याबरोबर एक दोरी आणि रिकामी टोपलीशिवाय काहीच आणलं नाही. मग तू आनंद कसा विकू शकतो? आणि त्यानंतर ते अजून जोरात हसत कारण ते त्या अनोळखी माणसाची चेष्टा करत असत.

पण फेरीवाला फक्त हसला. त्याने काही म्हटलं नाही. त्याने तिथं उपस्थित असलेल्या मुलाजवळ दोरी दिली. खरंतर मनात शंका घेण्याऐवजी लोकांना उत्सुकता वाटत होती. म्हणून लोक बघण्यासाठी चारी बाजूला जमा झाले.



जशी मुलाने दोरी खेचली, फेरीवाला गोल-गोल फिरे. मग दोरीचा जमिनीवर ढीग झाला जो एका टोपलीसारखा दिसत होता.






मग त्याने दोरीचा एक तुकडा रस्त्यावर विरोधी दिशेला फेकला, जो एका झाडाच्या फांद्यावर लटकला. मग त्याने दुसरा तुकडा आपल्याजवळच्या एका खांबांच्या चारी बाजूला बांधला.

“माझे दुकान आता उघडले आहे,”फेरीवाला म्हणाला, “आणि आता मी व्यापार करण्यासाठी तयार आहे. म्हणून तुमच्यापैकी जो कोणी दुःखी आहे, त्यांनी आपले सर्व दुःख आणि त्रास इथं घेऊन या. ते माझ्या टोपलीत टाका. त्याबदल्यात मी तुम्हांला आनंद देईन.



फेरीवाल्याने लोकांना कुजबुजतांना आणि आपापसात चर्चा करतांना बघितलं.



“मी विचार केला होता त्यापेक्षाही हा मोठा मूर्ख निघाला,”त्यातला एक माणूस हसत म्हणाला.

“त्यात जरूर काहीतरी चाल लपलेली असेल,” दुसरा म्हणाला.

तोच एक आवाज ऐकू आला, “चला करून बघू या आणि बघूया काय होते ते!”

“आपण आपले त्रास आणि दुःखांशिवाय अजून काय गमावू शकणार आहे?” एकजण म्हणाला.


त्यामुळे, अविश्वास असूनही सगळ्या लोकांनी आपल्या तक्रारी, त्रास आणि दुःख त्या अनोळखी माणसाच्या टोपलीत फेकले.



मग फेरीवाल्याने टोपली घेतली आणि ती दोरी उचलली. तिथं टोपली आपली आपण संतुलित झाली. अचानक टोपली दोरीच्या एका टोकावरून दुसऱ्या टोकाकडे लटकू लागली.

जसजशी टोपली लटकू लागली,तिने सर्व त्रास खाली पाडले.

लवकरच सर्व तक्रारी,त्रास आणि दुःख टोपलीच्या बाहेर पडले आणि सगळ्यांना बघण्यासाठी दोरीवर लटकू लागले..





त्यात मच्छीमाराने

घातलेले जुने स्वेटर होते. . . .

बेकरीवाल्याचे लाल केस होते.

शिंप्याची छड़ी. . .

आणि फुलवाली महिलेचे

फाटके बूट होते.





“आता माझ्या चांगल्या लोकांनो,”फेरीवाला म्हणाला. “तुम्हा लोकांना फक्त काम करण्याची गरज आहे.आपल्यातल्या प्रत्येकाने दोरीवरची एक समस्या किंवा बला उचला जी तुम्हांला सगळ्यात लहान वाटते.”

लोकांमध्ये एक गंभीर शांतता पसरली. मग प्रत्येक व्यक्ती फेरीवाल्याने सांगितलेल्या गोष्टीवर गंभीरतेने विचार करू लागला.

मासेमाऱ्याणे सर्व तक्रारी जवळून बघितल्या.मग तो म्हणाला, “मला माझे स्वेटर आवडत नाही कारण त्याला फोक आहे, आणि त्याचा रंग फिका पडला आहे. आणि त्याचे एक बटण गायब आहे. पण तरीही मी दुसऱ्या एखाद्या वस्तू ऐवजी मी तेच घेईन. मी नवीन बटण लावू शकतो आणि फोकांना रफू करू शकतो.आणि रंग फिका पडल्याने माझे स्वेटर आता एका नव्या रंगाचे दिसत आहे.



मग बेकरीवाला म्हणाला. “मी जुन्या फाटलेल्या स्वेटरचे काय करणार? मला माझ्या लाल केसांच्याबाबत तक्रार होती कारण त्यांच्यामुळेच मी शहरातल्या इतर लोकांपेक्षा वेगळा दिसत होतो.पण आता मी बघतो आहे की माझ्या केसांचा खरा रंग तोच आहे आणि माझे केस माझ्या अस्तित्वाचा एक हिस्सा आहे. म्हणून लाज वाटण्याच्या ऐवजी मला आपल्या लाल केसांचा गर्व वाटायला पाहिजे.



फूल वाली महिलेने शिंप्याला हसत म्हटले, “माझे बूट तुमच्यातल्या कोणालाच विचित्र वाटले नाही का? मी त्यांच्याबाबत आधी विचार केला नव्हता.पण आता मी माझ्या बुटांना पॉलिश करू शकते. आणि मग ते नवीन बुटांसारखे चमकतील. मला माझे जुने बूट हवे आहेत.”

शिंप्याने आपल्या काठीकडे बघितले आणि म्हटले, “माझी काठी मजबूत आहे आणि ती मला चालायला मदत करते.मग मी तिची तक्रार का करतो आहे. वास्तवात मी माझ्या काठीचे आभार मानतो.



लवकरच सगळ्यांना हे स्पष्ट झाले. जेव्हा प्रत्येक व्यक्तीने आपली स्वतःची तक्रार किंवा त्रासाला दोरीवर लटकतांना पाहिले तेव्हा त्यांना तो त्रास खूप छोटा आणि तुच्छ वाटू लागला.



लवकरच लोकांनी आपले त्रास, दोरीवरून उचलले. काही सेकंदातच दोरी रिकामी झाली.

“तुमच्यातला प्रत्येक जन आपली छोटीशशी तक्रार, त्रास उचलत आहे का? फेरीवाल्याने विचारले.

“हो!“ ते एकसाथ ओरडले.






“मग आता आपण सर्व खुश आहात!” फेरीवाल्याने विचारले. मग त्याने आपली टोपली उचलली आणि दोरी उचलली आणि तो तिथून निघून केला..



त्या क्षणानंतर गावातील लोकांकडे तक्रार करण्यासाठी किंवा त्यावर बोलण्याचे काही कारण नव्हते. त्यांनी आपल्या गावाचा प्रवास करणाऱ्या एका बुद्‌धिमान अनोळखी माणसाकडून एक मौल्यवान धडा घेतला होता.



आणि त्यानंतर पहाडाच्या तळात वसलेले ते सुंदर छोटेसे गाव राहण्यासाठी परत एक आनंदी आणि संपन्न गाव झाले.